
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा. (६९)
दा. क्र. ६४५०

...ाय माला
२०३ वे



# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर

ज्येष्ठ

IRBK-0106450
IRBK-0106450

. अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २ .

स्वाध्यायमाला : पुष्प २०३ वें

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# ज्येष्ठ मास

२२६३३
६४५०
वा.वा.

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

दा. क्र. ६४५०

संपादक मंडळ

डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.), एम्. ईडी.
श्री. शं ... बी.टी.,

IRBK-0106450

१८७८ ]

किंमत ४० नये पैसे

[ १९५७

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडेकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.
(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.
(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.
(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास–यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

अनुक्रम 22633
विभाग बा.वा
क्रमांक 595
30-11-80

# ज्येष्ठ मास

आतां तिसरा ज्येष्ठ महिना ! वसंत ऋतु केव्हांच संपला ! आतां ग्रीष्म ऋतु चालू झाला आहे. अन् उकाडाहि सुरू झाला आहे. ज्या पौर्णिमेला चंद्र ज्येष्ठा नक्षत्रांत असतो त्या पौर्णिमेच्या महिन्यास ज्येष्ठ असें म्हणावयाचें. ज्येष्ठ याचा अर्थ थोरला, वडील, पहिला किंवा मोठा. अर्थात् ज्येष्ठ मुलगा म्हणजे मोठा मुलगा. तो तर कुळाचा आधार ! इंग्लंडमध्यें ज्येष्ठ मुलालाच वडिलांची सर्व संपत्ति मिळते. वडिलांना लॉर्ड ही पदवी असल्यास तीहि ज्येष्ठ मुलालाच मिळते. आपल्याकडील ज्येष्ठ मुलावर इतर भावंडांची आई-वडिलांच्या खालोखाल मोठी जबाबदारी व मान असतो असें आपण मानतों. पण हा मान तेवढा दिसतो. मात्र त्याच्या मागें केवढा त्रास असतो तें नाहीं दिसत ! ज्येष्ठ मुलानें आपलें वागणें-बोलणें अगदीं व्यवस्थित ठेवावयास हवें. कारण धाकट्या भावंडांचा तो जणूं कित्ताच. त्यानें हट्ट केला कीं, धाकटीं हट्ट करतात. त्यानें अभ्यास छान केला कीं तीं अभ्यास छान करतात ! तेव्हां ज्येष्ठ मुलाचें कौतुक यासाठींच केलें जातें. ह्या कौतुकाची फेड करण्यासाठीं त्यानें उत्तम वागणक ठेवावयाची म्हणजे धाकटीं भावंडें आपोआप चांगलीं वागतात. आतां आपण या मासांतल्या सणांची माहिती घेऊं.

**श्रीगंगोत्सव**

ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून दशमीपर्यंत गंगा नदीच्या कांठीं जो उत्सव साजरा करतात, त्याला गंगोत्सव किंवा **दशहरा** म्हणतात. दशहरा म्हणजे दहा दिवसांचा समुदाय !

आपला भारत हा शेतकीप्रधान देश आहे ! आपल्या येथील मुख्य उत्पन्न शेतीचें आहे. अन् शेतीला नदीच्या पाण्याची फार मदत होते. त्यामुळें आपले पूर्वज नद्यांना फार मान देत. त्यांना आईसारखें मानीत. गंगानदीला अजून **गंगामाता** असें म्हणतात.

अन् गंगानदीला फारच पवित्र मानतात. गंगेच्या पाण्यांत आंघोळ केल्यानें सर्व पापें नाहींशीं होतात असा समज आहे. त्यामुळें ह्या दहा दिवसांत गंगेच्या कांठीं भाविक लोकांचा मेळावा जमतो.

गंगा नदीचा मोठेपणा अनेक कवींनीं वर्णन केला आहे. जगन्नाथ पंडित ह्या कवीनें '**गंगालहरी**' हें संस्कृत काव्य लिहिलें आहे. आणि मोरोपंत कवीनें '**गंगेची प्रार्थना**' ही मराठी कविता लिहिली आहे.

प्राचीन काळीं गंगा नदी स्वर्गांत होती अशी समजूत आहे. तिथें तिला **मंदाकिनी** म्हणतात. पृथ्वीवर **गंगा** हें नांव आहे. आणि पाताळांतील तिच्या प्रवाहाला **भागीरथी** म्हणतात. अशा रीतीनें तीन ठिकाणीं तिचा प्रवाह आहे. म्हणून तिला **त्रिपथगा** असें नांव पडलें आहे. त्रिपथगा म्हणजे तीन मार्गांतून जाणारी. ह्यावरून ही गंगा नदी केवढी मोठी असेल त्याची कल्पना करतां येते.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, गंगा हिमालयांत उगम पावते म्हणून ती स्वर्गांत रहाते असा समज झाला आहे.

तिला भागीरथी हें नांव कां पडलें, ह्याविषयीं फार मनोरंजक कथा आहे. ह्या कथेला गंगावतरण–गंगेचें अवतरण म्हणजे खालीं उतरणें–असें नांव आहे.

**भगीरथाचे यत्न**

इक्ष्वाकु कुलांत श्रीरामाचा जन्म झाला. आणि त्याच कुलांत त्याच्या पुष्कळ आधीं सगर नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें एकदां अश्वमेध यज्ञ केला. ह्या यज्ञाचें महत्त्व फार आहे. उगीच वाटेल तो माणूस हा यज्ञ नाहीं करूं शकत. तितक्याच योग्यतेचा, पराक्रमी राजा हवा ! अन् मग त्यानें यज्ञांत बळी देण्यासाठीं म्हणून एकादा अश्व–घोडा–पसंत करावयाचा. आणि आपल्या सेनेबरोबर तो घोडा देशोदेशींच्या राजांच्या राज्यांत धाडावयाचा. कांहीं राजे ह्या घोडयाच्या मालकाचा मोठेपणा मान्य करीत व त्याला सार्वभौम राजा मानण्यास तयार होत. आणि म्हणून घोडयाला व सैनिकांना ते मुकाटयानें आपल्या राज्यांतून हिंडूं देत. ज्यांना हें पसंत नसे ते लढाई करीत. घोडयाचा मालक पराक्रमी राजा असल्यामुळें त्याची सेनाहि पराक्रमी असे. ती लढाई जिंके आणि घोडयासह पुढील देशाला जाई.

सगर राजाचा हा घोडा एके दिवशीं चरत-चरत कपिल-मुनींच्या आश्रमाजवळ जाऊन पोहोंचला. तेव्हां घोडयाला शोधीत सगर राजाचे साठ हजार मुलगेहि तिथें आले. आपला घोडा कपिल-मुनींनीं मुद्दाम पळविला, अशी त्याची कल्पना झाली. अगदीं चुकीची कल्पना होती ती ! निव्वळ गैरसमज ! त्यांचा नाश होण्याची वेळ जवळ आली होती; म्हणूनच त्यांना अशी वाईट बुद्धि सुचली !

त्यांनीं त्या थोर मुनीला वाटेल तसें बोलण्यास सुरुवात केली. त्यांचा हा उद्धटपणा पाहून कपिल-मुनी संतापले. आणि त्यांनीं शाप दिला त्यांना. त्याबरोबर ते जागच्याजागीं जळून गेले आणि राख झाली त्यांची !

इकडे घोडा व सैन्य अजून परत येत नाहीं म्हणून सगर राजा काळजींत पडला. त्यानें आपला नातू अंशुमान् ह्याला शोध करण्यास पाठविलें. अंशुमान् कपिल-मुनींच्या आश्रमाकडे पोंचला. कपिलमुनींनीं त्याला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून अंशुमानाला फार वाईट वाटलें. त्यानें कपिल-मुनींना विचारलें— "आतां सगरराजाच्या मुलांच्या ह्या पापाचा नाश कशामुळें होऊं शकेल ? "

त्यावर कपिल-मुनींनीं उत्तर दिलें—" गंगा नदीचा प्रवाह जर ह्या जागेवरून वहात गेला तर त्यांचा उद्धार होईल ! "

हें ऐकून अंशुमान गंगा नदीला पृथ्वीवर आणण्याच्या प्रयत्नाला लागला; पण त्याला यश आलें नाहीं. नंतर त्याचा मुलगा दिलीप यानेंहि पुष्कळ खटपट केली; परंतु त्यालासुद्धां जमलें नाहीं. नंतर त्याचा मुलगा भगीरथ यानें हें कठिण काम पार पाडलें.

भगीरथानें घोर तपश्चर्या करून गंगामाईला प्रसन्न केलें व तिला पृथ्वीवर येण्याची विनंति केली. गंगामाई त्याला म्हणाली—" तुझ्या विनंतीप्रमाणें मीं पृथ्वीवर येण्यास तयार आहें. पण मग लोक मला मलीन करतील ना ? "

गंगेची ही शंका ऐकून भगीरथानें म्हटलें—" तूं पृथ्वीवर आल्यानंतर मुनिजन आपल्या पुण्यकर्मांनीं तुला पुनः पवित्र करतील ! "

गंगामाईला हें पटलें. पण पृथ्वीवर उतरतांना तिचा भार सहन कोण करणार ? त्यासाठीं शंकराला प्रसन्न करून घेण्याबद्दल तिनें भगीरथाला सुचविलें.

त्याप्रमाणें भगीरथानें शंकराला प्रसन्न केलें. गंगामाईच्या प्रवाहाचा भार आपल्या डोक्यावरील जटांमध्यें तोलण्याचें शंकरानें कबूल केलें. आणि ज्येष्ठ शुद्ध दशमीला गंगामाईचा प्रवाह स्वर्गांतून शंकराच्या जटांत पडूं लागला. तिथून ती नंतर पृथ्वीवर वाहूं लागली आणि तिनें सगराच्या मुलांचा उद्धार केला.



भगीरथानें गंगामाईला आणली; म्हणून तिचें **भागीरथी** हें नांव पडलें. ह्या कामांत भगीरथाला विलक्षण अडचणी आल्या. फारच कष्ट करावे लागले; पण त्यानें चिकाटी सोडली नाहीं. अन्

म्हणूनच चिकाटीनें केलेल्या प्रयत्नाला '**भगीरथ प्रयत्न**' असें म्हणतात !

तुकारामानें म्हटलें आहे कीं, 'निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेंचि फळ'—आपण एकादें काम करण्याचा निश्चय केला कीं, त्यासाठीं मनापासून झटलें म्हणजे यश मिळणारच !

भगीरथाला आपल्या पूर्वजांविषयीं किती आदर वाटत होता ! कपिलमुनीच्या शापानें राख होऊन पडलेल्या सगर राजाच्या त्या साठ हजार मुलांना त्यानें कधीं पाहिलें तरी होतें का ? त्याचे पणजोबा लागत होते ते ! पण आपल्या आजोबांनीं आणि वडिलांनीं हातीं घेतलेलें काम आपण पुरें करणें हें त्याला आपलें कर्तव्य वाटलें !

अन् हें अगदीं बरोबर आहे ! आपल्या आयुष्यांत आपल्याला अशीं अनेक कर्तव्यें करावीं लागतात. आईबाप, शिक्षक नि आपली जन्मभूमि ह्यांनीं आपल्याला जन्म देऊन, शिकवून, वाढवून आपल्यावर उपकार केलेले असतात. ह्या सर्वांचें ऋण-कर्ज—प्रेमाचें कर्ज—आपल्या डोक्यावर असतें ! आईबापांच्या नांवाला, कुळाला मोठेपणा येईल असें वागल्यानें त्यांचें कर्ज फिटतें ! शिक्षकांनीं दिलेल्या शिक्षणाचा उत्तम उपयोग केला कीं त्यांचें कर्ज फिटतें. आणि आपल्या जन्मभूमीसाठीं कष्ट केले, तिची सुधारणा करण्याचा प्रयत्न केला म्हणजे तिचें कर्ज फिटून जातें !

अशा रीतीनें वागल्यानें आपल्या आयुष्याचें सार्थक होतें. भगीरथानें आपल्या आयुष्याचें सार्थक केलें ! आज इतकीं वर्षें लोटलीं तरी कोणी कमालीचे श्रम केले कीं, 'वा ! त्यानें भगीरथ प्रयत्न केले—' असें भगीरथाचें नांव निघतें !

आपल्या पूर्वजांची शापांतून सुटका करावी, त्यांना स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणून किती झटला भगीरथ! मेलेल्या पूर्वजांसाठीं त्यानें एवढी झीज सोसली! मग आपले जिवंत नातलग संकटांत सांपडल्या वेळीं आपणहि नको का अशीच झीज सोसावयाला?

गंगावतरणाच्या ह्या कथेपासून आपण एवढें शिकलों तरी पुष्कळ!

**पवित्र गंगा नदी**

गंगोत्सवांतील ह्या दहा दिवसांत नि विशेषत: ज्येष्ठ शुद्ध दशमीच्या दिवशीं गंगेमध्यें आंघोळ केल्यानें पाप नाहींसें होतें असें मानतात.

फार पूर्वीपासून गंगा नदीला पवित्र मानली आहे. त्याचें कारण असें कीं, गंगा नदीच्या सुपीक खोऱ्यांत आर्यलोक पहिल्यांदां राहिले. आपल्या भारतांतील शेतीसाठीं पाऊसपाण्याची फार गरज असते. आणि ज्या गांवांत पाऊस कमी पडतो तिथें नदीच्या पाण्यावरच शेती करितात. अन् म्हणूनच आपल्या भारतांत नदीला पवित्र मानतात.

आणि गंमत अशी कीं, इतरहि अनेक नद्यांना 'गंगा' ह्या नांवानें गौरविलें जातें.

नाशिकजवळच्या गोदावरीला गंगा म्हणतात. वाईजवळच्या कृष्णेलाही गंगा म्हणतात. आणि पंढरपूरच्या चंद्रभागेलाहि गंगा म्हणतात! एवढें गंगा नदीचें महत्त्व आहे.

ह्या गंगा नदीविषयी एक दंतकथा सांगतात. दंतकथा म्हणजे ऐकीव गोष्ट. तिला सत्याचा पूर्ण आधार असतोच असें नाहीं. एकानें ऐकली ती दुसऱ्याला सांगतली. त्यानें तिसऱ्या सांगितली असें चालतें.

तर ही दंतकथा अशी आहे कीं, वर्षभर गंगा नदींत लोक आंघोळी करितात. त्यांची पापें नदीच्या पाण्यानें धुऊन जातात. पण हा सारा भार त्या गंगामाईला सहन करावा लागतो ना? म्हणून वर्षांतून एक दिवस ती काळ्या रंगाची गाय बनते. आणि नर्मदा नदीमध्यें जाऊन आंघोळ करते. नि मग ती पूर्वीसारखी पवित्र होते!

दंतकथाच ही—तेव्हां ती खरी असेल असें नाहीं. पण ह्याचा अर्थ असा कीं, वाईटाच्या सहवासानें चांगली गोष्टसुद्धां वाईट होऊं शकते. तेव्हां आपण वाईटाचा सहवास टाळावाच मुळीं! एकादा मित्र लबाड किंवा चोरटा आहे असें कळलें कीं, त्याची मैत्री तोडावी! कारण बहुधा सारख्या स्वभावाच्या मुलांमुलांची किंवा मुलींमुलींची मैत्री असते! तेव्हां वाईट मित्रामुळें तुम्हां-लाहि लोक वाईट ठरवितील! अन् अशा वाईट मित्राची किंवा मैत्रिणीची संगत तुम्ही सोडलीत म्हणजे त्या मित्राला दुःख वाटेल. पश्चात्ताप होईल व तो कदाचित् सुधारेल! त्यासाठीं पांढऱ्या शुभ्र पाण्याची गंगा नदी काळी गाय बनते ही दंतकथा लक्षांत ठेवा.

**झांशीच्या लक्ष्मीबाईची पुण्यतिथि**

ज्येष्ठ महिन्यांतल्या शुद्ध षष्ठीला झांशीच्या लक्ष्मीबाईची पुण्यतिथि येते.

झांशीची राणी लक्ष्मीबाई ही मोठी शूर स्त्री होऊन गेली. ग्वाल्हेरच्या मोरोपंत तांब्यांची ही मुलगी. हिचें नांव मनूताई होतें. उत्तर-हिंदुस्थानांतील यमुना नदीच्या दक्षिणेकडे झांशी हें पूर्वी संस्थान होतें. त्या संस्थानचे राजे गंगाधरराव बाबासाहेब ह्यांच्याशीं मनूताईचें लग्न झालें व तिचें नांव लक्ष्मीबाई

अनुक्रम २२६३३ ११ बा. वा. १९ ३०-१२-५८

ठेवण्यांत आलें. आठव्या वर्षीं तिचें लग्न झालें. पुढें तिला मुलगा झाला; पण तो मरण पावला. (आणि लक्ष्मीबाई फक्त अठरा वर्षांची असतांना तिचा नवराहि वारला.) परंतु गंगाधर-रावांनीं आपल्याच नात्यांतला एक मुलगा दत्तक घेतला होता. त्यामुळें लक्ष्मीबाईला तितकेंच बरें वाटत होतें. आपल्या पोटचा मुलगा नाहीं तर निदान हा दत्तक मुलगा तरी आहे !



पण त्यावेळीं ब्रिटिश लोकांची सत्ता चालू होती. इंग्लंडच्या राजाच्या वतीनें लॉर्ड डलहौसी येथील व्यवस्था पहात होता. मुलगा नसलेला एकादा राजा मरण पावला कीं, त्याचें संस्थान ब्रिटिशांच्या सत्तेखालीं घेई तो ! अशा रीतीनें त्यानें सातारा, नागपूर येथील मोठीं मोठीं राज्यें घशांत घातलीं. ह्याला **खालसा करणें** असें म्हणतात.

आणि गंगाधररावांनीं व्यवस्थित रीतीनें मुलगा दत्तक घेतला असूनहि लॉर्ड डलहौसीनें झांशीचें राज्य खालसा केलें !

आणि लक्ष्मीबाईच्या अंगांतील पराक्रमाची ह्याचमुळें जगाला माहिती झाली.

आपली झांशी आपल्या दत्तक मुलाला मिळावी म्हणून लक्ष्मी-बाईनें पुष्कळ प्रयत्न केले. अगदीं भगीरथ प्रयत्न केले. हजारों रुपये खर्चून विलायतेपर्यंत खटपट केली. पण व्यर्थ ! लक्ष्मीबाईला

विलक्षण संताप आला. झांशी खालसा केल्यानंतर लक्ष्मीबाईला इंग्रज सरकारनें वर्षाचे साठ हजार रुपये नेमून दिले होते; पण त्या मानी बाईनें ते पैसे घेतले नाहींत.

आपल्या हक्काचें राज्य बळकावलें. आणि त्यांतूनच आपल्याला त्यांनीं उचलून पैसे द्यावे हें तिला आवडलें नाहीं! अशा वृतीच्या माणसांना **मानधन माणसें** म्हणतात! मान हेंच त्यांचें धन! त्यांचा मान दुखवून मिळणारें धन त्यांना नको असतें. तसला पैसा त्यांना तुच्छ वाटतो. म्हणूनच लक्ष्मीबाईनें ते साठ हजार रुपये नाकारले.

झांशी खालसा केल्यावर तिथें एक गोऱ्या सैनिकांची पलटण ठेविली होती. त्यांच्यासाठीं गोवध होऊं लागला! आपल्या हिंदुधर्मांत आपण गोमातेला–गाईला–पवित्र मानतों. तिचें मांस खाणें तर आपल्याला रुचत नाहींच; पण दुसऱ्यांनीं आपल्यासमोर खाल्लेलेंहि आवडत नाहीं! त्याचमुळें हा गोवध पाहून लक्ष्मीबाईला फार चीड आली. झांशी संस्थानांत देवादिकांच्या पूजेसाठीं बराच पैसा खर्च होत असे; पण लॉर्ड डलहौसीनें तो बंद करून टाकला. अशा रीतीनें लक्ष्मीबाईला राग येण्यासारख्या अनेक गोष्टी घडल्या. नवरा वारल्यामुळें ती दुःखानें खचली होती. त्यांतच राज्य खालसा झाल्यामुळें अपमानाची भर पडली. परक्या लोकांनीं आपल्या धर्माचा छळ चालविलेला पाहून तिच्या रागाचा पारा चढला! ती स्वाभिमानी राणी एकाद्या नागिणीप्रमाणें चवताळली. तिनें झांशींत बंडाची वावटळ उठविली. लपविलेला दारूगोळा व तोफा बाहेर काढल्या. आणि हां हां म्हणतां मोठें सैन्य तयार केलें!

झांशीमध्यें असलेल्या इंग्रज लोकांची राणीच्या सैन्यानें कत्तल

केली. आणि आपली आवडती झांशी तिनें परत मिळविली. पण हा आनंद थोडा काळच टिकला.

**इंग्रजांशीं झटापट**

इंग्रज सरकारनें मोठें थोरलें सैन्य झांशीवर पाठविलें. ह्या सैन्याचा मुख्य सर ह्यू रोज् होता. या लढाईवर छान पोवाडे रचले आहेत. लक्ष्मीबाईच्या शौर्याचें त्यांत सुरेख वर्णन केलें आहे. ते चालीवर मोठ्यांदां म्हणतांना मन तल्लीन होतें. ऐकणाऱ्यांच्या आणि म्हणणाऱ्यांच्या अंगांत पराक्रमाचें वारें शिरतें! लक्ष्मीबाईचा पोवाडा प्रत्येकानें पाठ करावा आणि वारंवार म्हणावा! त्यामुळें मायभूमीबद्दलचें प्रेम वाढेल! आपणहि मायभूमीसाठीं असेच थोडेतरी कष्ट करावे अशी ओढ वाटेल! आणि तें करण्याची स्फूर्ति मिळेल!

इंग्रज सैन्यानें झांशीभोंवतीं वेढा घातला होता. सतत अकरा दिवस लढाई चालली होती. शेवटीं इंग्रजांचा जय झाला! वेशीचे दरवाजे फोडून इंग्रज-शिपाई आंत घुसले.

तरीहि राणीनें धीर सोडला नाही. आपल्या दत्तक मुलाला



पाठीशीं बांधून ती आपल्या घोड्यावर स्वार झाली आणि त्या घोड्यानें तिच्यासह तटावरून उडी मारली.

ही बातमी कळतांच सर ह्यू रोज् तिचा पाठलाग करण्यास निघाला.

काल्पी ह्या गांवीं पुनः दोघांची लढाई झाली. आणि पुनः राणीचा पराभव झाला.

**झांशीची लढाई**

नानासाहेब पेशवे, त्यांचे सेनापति तात्या टोपे व रावसाहेब हे तिला मदत करीत होते. पण ही मंडळी हरली. तेव्हां राणी त्यांना घेऊन ग्वाल्हेरला गेली. तिथल्या राजाची मदत या मंडळीनें मागितली. पण तो इंग्रज-सरकाचा दोस्त होता. त्यानें राणीशीं उलट लढाईच केली! ती लढाई राणीनें जिंकली. ग्वाहेर तिच्या ताब्यांत आलें. पण तेथें रावसाहेबांनीं स्वतःला पेशवा बनविला. आणि ते थाटामाटांत गंमत करूं लागले!

लक्ष्मीबाईला हें आवडलें नाहीं. ती नुसती शूर नव्हती. हुषारहि होती. तिला बरेंवाईट कळत होतें; पण तिचें सांगणें पेशव्यांना पटलें नाहीं.

ते असेच आरामांत राहूं लागले. आणि एक दिवस इंग्रज-सरकारचें सैन्य येऊन थडकलें. त्यांनीं ग्वाल्हेरला वेढा दिला. उभयतांची लढाई जुंपली. रावसाहेब व तात्या टोपे ह्या पुरुषांच्या बरोबरीनें लक्ष्मीबाई लढली!

लढतांना ती लुगड्याचा दुटांगी कासोटा मारी. पदर कंबरेला घट्ट खोंचून टाकी. आणि डोक्याला पुरुषासारखा पटका बांधी! या वेषांत ती लढाईची देवीच दिसे जणूं!

सतत तीन दिवस ही लढाई चालली. लक्ष्मीबाई सारखी आपल्या लोकांना धीर देत होती. पण ज्येष्ठ शुद्ध षष्ठीच्या

दिवशीं लढत असतां तिला मोठी जखम झाली ! घोड्यावरून ती खालीं कोसळली ! अन् या शूर राणीचा रणांगणावर शेवट झाला !

वीर पुरुषांना असा रणांगणावर——लढाईच्या मैदानावर— मृत्यु येणें अभिमानाचें वाटे ! लक्ष्मीबाईला असें वीराचें मरण आलें !

आपल्या मायभूमीसाठीं ती जगली ! आणि आपल्या मायभूमीसाठींच मेली ! मायभूमीचें ऋण तिनें पुरेपूर फेडलें ! — तिच्या समाधीचें वर्णन करतांना हिन्दी कवयित्री श्री सुभद्राकुमारी चौहान या लिहितात——

**बढ़ जाता है मान वीरका रणमें बलि होनेसे ।**
**मूल्यवती होती सोनेकी भस्म यथा सोनेसे ।।**
**रानीसे भी अधिक हमें अब यह समाधि है प्यारी ।**
**यहाँ निहित है स्वतन्त्रताकी आशाकी चिनगारी ।।**

## सावित्री पौर्णिमा

यानंतर ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशीं वटसावित्रीचें स्मरण आपण करितों ! – ह्या व्रताला **वटसावित्री** म्हणतात. आणि त्यावरून ह्या पौर्णिमेला **वटपौर्णिमा** म्हणतात.

सावित्रीची कथा ऐका हं आतां. अश्वपति या नांवाचा एक राजा होता. त्याची सावित्री ही एकुलती एक मुलगी होती. ती फार हुषार, शहाणी होती. त्यामुळें बापानें तिलाच स्वतःचा नवरा शोधावयास सांगितलें. आणि त्याप्रमाणें सावित्रीनें सत्यवानाला पसंत केलें.

सत्यवानाचा बाप त्यावेळीं रानांत रहात होता. कारण शत्रूंनीं त्याचें राज्य जिंकून घेतलें होतें. आणि म्हातारपणामुळें बापडा आंधळा झाला होता. पण सावित्रीला सत्यवानाच्या सद्‌गुणांची किंमत वाटली. तो आतां राजपुत्र नव्हता. अर्थातच पुढें तो राजा होणें शक्य नव्हतें. पण सावित्रीला असल्या गोष्टीची पर्वा वाटत नव्हती.

तिच्या आईबापांना सुद्धां तिची पसंती आवडली. परंतु नारदमुनींना आवडली नाहीं. कारण सत्यवान् अल्पायुषी आहे, हें त्यांना ठाऊक होतें. आणखी एकच वर्ष त्याचें आयुष्य होतें. नंतर तो मरणार ! तेव्हां असा नवरा सावित्रीनें कां पत्करावा ? भरपूर आयुष्य असलेला दुसरा नवरा शोधावा तिनें.

अश्वपतीनेंहि सावित्रीला हाच आग्रह केला. पण उंहुं ऽ ! सावित्रीनें निश्चय केला तो केला !

मोरोपंत कवीनें ह्या कथेवर ‘ सावित्री आख्यान ’ हें काव्य केलें आहे. त्यांत सावित्री आपल्या बापाला सांगते--

**“ न त्यजुनि पयोधिला नदी परते ।”**

म्हणजे समुद्राला टाकून नदी मागें फिरत नसते ! त्याचप्रमाणें एकदां सत्यवानाला पति मानलें. आतां तो निश्चय बदलणार नाहीं ! जणूं सावित्री ही नदी. आणि सत्यवान् हा समुद्र ! –

सावित्रीच्या या निश्चयापुढें अश्वपतीचाहि नाइलाज झाला ! ठरल्याप्रमाणें तिचें सत्यवानाशीं लग्न झालें. अश्वपतीच्या राजवाड्यांत नाहीं हं तें झालें ! रानांत जिथें सत्यवानाचे आईबाप रहात होते तिथें सावित्रीचें सत्यवानाशीं लग्न झालें.

आपल्या आईबापांना वाईट वाटूं नये म्हणून सावित्रीनें अंगावर दागिने घातले. पण अश्वपति परत जातांच तिनें

सारा डामडौल टाकला. कारण सत्यवान् आणि त्याचे आई-वडील सध्यां गरिबींत रहात होते. तेव्हां माहेरच्या श्रीमंतीचा दिमाख दाखविणें सावित्रीला आवडेना ! खरी समंजस नि प्रेमळ होती ती !

तिचा हा शहाणपणा पाहून तिच्या सासूसासऱ्यांना विलक्षण आनंद वाटला. त्यांची फार माया जडली तिच्यावर !

मुलीनें प्रेमानें आईबापांची सेवा करावी तशी सावित्री त्यांची सेवा करी.

सत्यवान्-सावित्रीचा रानांतला हा संसार सुखानें चालला होता ! रानांतल्या त्या झोंपडींत नोकर-चाकर नव्हते ! ऐष-आरामाच्या वस्तु नव्हत्या ! अन् तरीहि तीं चार माणसें सुखांत होतीं !

कारण पैसा म्हणजेच सुख नाहीं ! पैसा हें सुख मिळविण्याचें साधन आहे ! पैशामुळें सुख मिळूं शकतें ! पण पैसा असला कीं सुख खात्रीनें मिळतें असें नाहीं ! आणि पैसा नसला कीं दुःखच भोगावें लागतें असेंहि नाहीं ! असें असतें तर सारीं श्रीमंत माणसें कायमचीं सुखी झालीं असतीं ! आणि सारीं गरीब माणसें कायमचीं दुःखी झालीं असतीं !

पण जगांत अनेकदां श्रीमंत माणसें दुःखी आढळतात. आणि गरीब माणसें सुखी आढळतात. तेव्हां पैशाप्रमाणें इतर गोष्टीं-मुळेंहि सुख मिळूं शकतें ! घरांतलीं सर्व माणसें समाधानी वृत्तीचीं असलीं म्हणजे सुख मिळतें ! सगळीं एकमेकांशीं प्रेमानें वागत असलीं म्हणजे सुख मिळतें ! एकमेकांसाठीं त्याग करण्याची प्रत्येकाची तयारी असली म्हणजेहि सुख मिळतें.

तेव्हां सावित्री, सत्यवान् आणि त्याचे आईबाप सुखी होते ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं ! परंतु सत्यवानाला आयुष्य कमी आहे, हें ठाऊक झाल्यामुळें मधूनमधून सावित्री भयभीत होई ! पण आपलीं कर्तव्यें ती मनापासून करी.

दिवस लोटले. महिने लोटले. आणि सत्यवानाच्या मृत्यूची वेळ चार दिवसांवर येऊन ठेपली.

सावित्रीनें कडक उपास करण्यास सुरुवात केली. रात्रंदिवस उभी असे ती. कारण अन्नाबरोबर तिनें झोंपहि सोडली होती. आपल्याला प्रत्यक्ष मृत्यूला हरवावयाचें आहे हें लक्षांत होतें तिच्या ! अन् त्यासाठीं ती आपल्या मनाची शक्ति वाढवीत होती ! मन शक्य तेवढें शुद्ध, पवित्र करीत होती ! आणि अशा तऱ्हेचा कडकडीत उपास केल्यानें मन शुद्ध होतें ! जिभेवर ताबा ठेवण्याची संवय लागते आणि त्यामुळें मनाची शक्ति वाढते ! सावित्रीनें आपल्या मनाची शक्ति पुष्कळ वाढविली ह्या तीन दिवसांत.

चौथ्या दिवशीं सकाळी नेहमींप्रमाणें सत्यवान् रानांत जाण्यास निघाला. तो रोज रानांत जाऊन लांकडें तोडून आणीत असे. सावित्रीहि त्याच्याबरोबर निघाली.

आज आपला मृत्यु होणार आहे, ही सत्यवानाला कल्पनाच नव्हती. तो मजेनें रानांतून चालला होता.

मृगाच्या पावसाच्या सरी पडून गेल्या होत्या. त्यामुळें आनंदित झालेले मोर नाचत होते. गमतीनें ओरडत होते. कुठेंकुठें पाण्याचे झरे वहात होते. सत्यवान् ही सारी मौज सावित्रीला दाखवीत होता. निसर्गाचें हें सौंदर्य पाहून त्याला आनंद वाटत होता; पण सावित्री घाबरीघुबरी झाली होती ! तरीहि ती वरून शांत दिसत होती.

तीं दोघें वनांत पोंचलीं. सत्यवान् कुऱ्हाडीनें नेहमींप्रमाणें लांकडें तोडूं लागला; पण लांकडें तोडतांना त्याला एकाएकीं थकवा आला आणि तो धाडकन् जमिनीवर पडला. जणूं लांकडाचा तोडलेला ओंडकाच !

सावित्रीनें सत्यवानाचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें आणि ती पदरानें त्याला वारा घालूं लागली. पण नारदानें सांगितलेली भयंकर वेळ आली हें तिनें ओळखलें.

एवढ्यांत समोरून एक भव्य पुरुष येतांना तिला दिसला. हा मृत्यूचा देव यम होता. सूर्यासारखा तेजस्वी होता तो. त्याच्या हातांत दोरीचा फांस होता. **यमपाश** म्हणतात त्याला. यमानें हा



फांस सत्यवानाच्या गळ्याभोंवतीं घातला. त्यासरशी सत्यवान् मरण पावला ! त्याचा देह लांकडासारखा ताठ झाला.

सत्यवानाचे प्राण घेऊन यम यमलोकाला निघाला. तशी सावित्रीनें सत्यवानाचें डोकें हळूच जमिनीवर ठेविलें आणि ती यमाच्या मागून जाऊं लागली.

यमानें तिला म्हटलें–"तूं कां येतेस ? तूं परत जा." पण सावित्री ऐकेना. जिथें नवरा तिथें आपण हाच हट्ट धरला तिनें. यमानें पुष्कळ समजूत केली. पण छेः ! तेव्हां त्यानें तिला सत्यवानाच्या प्राणांखेरीज कांहींहि मागण्यास सांगितलें.

सावित्रीनें सासऱ्याचे डोळे नीट व्हावे अशी विनंति केली. नंतर त्याचें गेलेलें राज्य मागून घेतलें.

आणि नंतर मोठ्या खुबीखुबीनें स्वतःला मुलगा व्हावा, अशी मागणी केली. यमानें पटकन् तसा आशीर्वाद दिला. आणि तो आपल्या शब्दांत अडकला. सत्यवानाचे प्राण परत देणें त्याला भाग पडलें !

सावित्रीला विलक्षण आनंद झाला. ती धांवत आपल्या नवऱ्याच्या प्रेताकडे आली. तिनें सत्यवानाचें डोकें मांडीवर घेतलें. अन् हळूहळू तो भानावर येऊं लागला. त्याचा मृत्यु टळला ! काळ आला होता; पण सावित्रीनें त्याला परत पाठविला !

सावित्रीनें आपल्या दृढनिश्चयाच्या जोरावर मृत्यूला जिंकलें.

प्रत्येकानें आपल्या अंगीं हे गुण आणले तर जगांत आपल्याला अनेक गोष्टी जिंकून आणतां येतील ! कष्टावांचून फळ नाहीं ! तेव्हां सावित्रीची कथा ऐकून आपण तिच्या अंगांतील अनेक गुणांचा अभ्यास करावा. हे गुण आपल्या अंगांत असले तर आपण संकटांवर जय मिळवूं शकूं.

म. ह. ग्रं. ... वाचनालय ...
ग्र. क्र. ८९५० ... दि. ...
दि. ...

कधींकधीं आपणांवर फार मोठीं संकटें येतात. त्यापायीं आपल्याला फारच त्रास सोसावा लागतो. पण आपल्या अंगांत चिकाटी असली, धैर्य असलें, आपला निश्चय दृढ असला कीं, त्या संकटांची आपल्याला एवढी भीति वाटत नाहीं ! मन खंबीर असलें कीं धैर्य हजार पट वाढतें ! आणि भगीरथ प्रयत्न करण्यास उमेद येते.

तेव्हां आपल्यावर कांहीं संकट आलें म्हणजे सावित्रीचें स्मरण करावें. तिनें मृत्यूवर जय मिळविला; मग आपण संकटावर कां मिळवणार नाहीं ?

सत्यवानाचे प्राण यमानें हरण केले त्यावेळीं तो वडाच्या झाडाखालीं पडला होता. आणि त्या वडाच्या झाडाखालींच सावित्रीनें त्याला पुनः जिवंत केला. त्यामुळें वडाला वर्षानुवर्षें केवढें महत्त्व प्राप्त झालें आहे ! सावित्रीच्या मूर्तीची पूजा करण्याऐवजीं बायका वडाच्या फांदीची पूजा करतात !

मोठ्या माणसांचा महिमाच असा असतो ! ते स्वतः तर मोठे असतातच; पण ते आपला मोठेपणा दुसऱ्यांना देतात आणि त्यांना मोठे करतात. त्यामुळें त्यांचा मोठेपणा कमी नाहीं बरं होत ! तो उलट वाढतोच !

'पुष्पसंगें मातीस वास लागे' हें खरें आहे ! फूल मातींत पडलें तर माती सुवासिक होते, अन् तरीही पुष्पाचा सुगंध कमी नाहीं होत !

विद्येचेंसुद्धां असेंच आहे ! विद्या दिली म्हणजे वाढते. आपल्याला जें येतें तें खुशाल दुसऱ्याला शिकवावें. त्यामुळें आपलें ज्ञान पक्कें होतें. पण पुष्कळ मुलांना असें वाटतें कीं,

आपलें ज्ञान आपल्याजवळच ठेवावें. दुसऱ्याला देऊं नये. कारण दुसरीं मुलें मग हुषार होतील. आणि आपली हुषारी फिक्की पडेल ! पण ही भीति व्यर्थ आहे ! दुसऱ्याला आपली विद्या दिली तर खरं म्हणजे पुण्य लागतें ! आणि दुसऱ्याला थोडें शिकविलें तर आपलें ज्ञान अधिक पक्कें होतें. आणि आपल्याला पुण्यहि लागतें ! कळलें ना ?

तेव्हां तुम्हांला जें जें ठाऊक आहे तें तें मोकळ्या मनानें आपल्या मित्रमैत्रिणींना आणि भावंडांना सांगा.

**ज्येष्ठ महिन्यांत** निवडकच महत्त्वाचे दिवस असले तरी तेहि सगळे मोठेच आहेत.

दहा दिवस चालणाऱ्या गंगोत्सवाची माहिती किती महत्त्वाची आहे ! आणि भगीरथ तर केवढा मोठा होता ! आपण नेहमीं स्वार्थ आणि परार्थ साधीत असतों. स्वार्थ म्हणजे स्वतः चा अर्थ. म्हणजे आपण शक्य तों स्वतःचें हित करीत असतों. मात्र तें करतांना परार्थ म्हणजे दुसऱ्याचें हितहि साधलें पाहिजे. आणि सर्वसाधारण माणसें असें आपलें व दुसऱ्याचें हित करतात.

अर्थातच आधीं आपली सोय पहावयाची आणि नंतर दुसऱ्याची. साधुसंत आधीं दुसऱ्याच्या हिताची काळजी वहातात. पण आपल्याला तें कसें जमणार ? आणि संतजनसुद्धां आपल्याकडून तशी अपेक्षा करीत नाहींत. ते सांगतातच कीं, "आधीं संसार करावा नेटका". तेव्हां संसारांतील आपलीं कर्तव्यें आधीं पार पाडावीं. स्वार्थ आधीं साधावा. आणि नंतर परार्थ साधावा. असें वागल्यानें आपल्या अंगांतील माणुसकी कळून येते. मनुष्य ह्या नात्यानें आपण असें वागावयास हवें.

अनुक्रम २२६३०९ वाच ८१ 30-9-78

अंगांत माणुसकी फारशी नसलेलीं माणसें आपले हित साधलें जावें म्हणून कधीं कधीं दुसऱ्याचें नुकसान करितात. आणि ह्याच्या पलीकडील माणसें त्यांत आपला कांहींहि फायदा नसतांना उगीचच दुसऱ्यांचें नुकसान करितात. ह्यांच्या अंगांत माणुसकीचा लवलेशहि नसतो !

आणि सर्वांत उत्तम माणूस म्हणजे स्वार्थाकडे लक्षहि न देतां परार्थ साधणारा. साधुसंत ह्या वर्गांत येतात. आणि भगीरथहि ह्याच वर्गांतील होता. गंगेचा प्रवाह पृथ्वीवर आणण्यांत त्याचा कोणता स्वार्थ होता ? त्यानें इतरांसाठींच ना एवढे कष्ट केले ? आपल्या मेलेल्या पणजोबांसाठीं त्यानें इतके श्रम घेतले. आणि भारतांतील सर्वच लोकांना त्यापासून फायदा मिळाला.

**तीन थोर माणसें**

तेव्हां भगीरथानें परार्थच पूर्णपणें साधला ! भगीरथ अत्यंत वरच्या दर्जाचा माणूस होता. पण तरीहि त्याचा आदर्श आपण पुढें ठेवावा असें मीं नाहीं म्हणणार ! कारण एकदम एवढा उंच आदर्श ठेवण्यांत काय अर्थ ? आदर्श म्हणजे अनुकरण करण्यासारखी उत्तम गोष्ट ! पण ती उत्तम गोष्ट अनुकरण करण्यासारखी हवी ! म्हणूनच भगीरथाचा आदर्श ठेवणें ठीक नाहीं ! त्याचें अनुकरण आपल्या हातून कसें होऊं शकणार ! नि मग उगीचच निराशा पदरांत येणार. तेव्हां दुसऱ्या नंबराचा माणूस होण्याची महत्त्वाकांक्षा धरावी आणि त्या दृष्टीनें प्रयत्न करीत रहावें. आपला अभ्यास झाला कीं, दुसऱ्यांना अभ्यासांत मदत करावी. घरीं आईला काम करूं लागावें. अन् मोठेपणीं पैसा मिळवूं लागल्यावर हा आदर्श सोडावयाचा नाहीं बरं !

आपल्याला हवा असेल तेवढा पैसा ठेवावयाचा आणि गरीब-गुरीबांना उरलेल्या पैशांतून मदत करावयाची.

आतांसुद्धां खाऊसाठीं मिळणारे पैसे नेहमींच खाऊकरितां खर्च करूं नयेत. त्यांतून गरीब विद्यार्थ्याला पुस्तकांसाठीं, फीसाठीं थोडी मदत करावी. लहानपणींच अशी परार्थ साधण्याची संवय लागली कीं, मोठेपणीं ती अधिक दृढ होईल! आणि ज्येष्ठ मुलगा तुम्हीं नसलांत तरी गुणांनीं ज्येष्ठ व्हाल! मोठे व्हाल! ज्येष्ठ मुलानेंच आपल्या अंगावर सगळा भार घ्यावयाचा असा कांहीं नियम नाही. मधल्यानें, धाकट्यानें तो खुशाल घ्यावा! चांगली गोष्ट करावयाला कधींच हरकत नसते! वेळाचें, वयाचें कसलेंच बंधन नसतें!

तुम्हीं अवश्य भगीरथाप्रमाणें भगीरथ प्रयत्न करा आणि लक्ष्मीबाईप्रमाणें मानधन व्हा, शूर व्हा! आणि सावित्रीप्रमाणें दृढनिश्चयी व्हा, चिकाटी धरा.

लक्ष्मीबाई आणि सावित्री ह्या स्त्रिया होत्या. म्हणून मुलींनींच त्यांचा आदर्श डोळ्यापुढें ठेवावयाचा असें नव्हे. चांगल्या गोष्टीचें कोणीहि अनुकरण करावें. मुलींनींहि भगीरथ प्रयत्न करण्याची आवड बाळगावी.

संस्कृतांत ह्याबद्दल एक सुंदर खूण सांगितली आहे. ज्यांना गुणांचें कौतुक वाटतें, जे स्वतः गुणी आहेत ते इतरांच्या गुणांना मान देतात. अशा वेळीं ते लिंग किंवा वय ह्यांची पर्वा करीत नाहींत. म्हणजे ज्याच्या गुणांना मान द्यावयाचा तो पुरुष आहे कीं स्त्री आहे ह्याला महत्त्व देत नाहींत. गुणांची पूजा करावयाची हेंच खरें!

प्रत्येकानें हेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे. अन् अशा रीतीनें ज्येष्ठ महिन्यांतील ह्या तीन माणसांच्या गुणांची पूजा केली तर प्रत्येकजण स्वतःहि असाच गुणांनीं, कीर्तीनें ज्येष्ठ होईल ! नुसतें जन्मानें ज्येष्ठ असण्यांत काय मोठें ? ती आपल्या हातची गोष्ट नसतेच मुळीं ! गुणांनीं, कीर्तीनें ज्येष्ठ होणें आपल्या हातीं आहे आणि तसें होण्याचा आदर्श प्रत्येकानें बाळगावयाला हवा आणि तो पुरा करावयाला हवा.

## स्वाध्याय

(१) कपिल मुनींनीं सगर-पुत्रांना शाप कां दिला ?

(२) सगर-पुत्रांच्या उद्धारासाठीं भगीरथानें कोणते प्रयत्न केले ?

(३) १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांतील झांशीच्या राणीची कामगिरी सांगा.

(४) वटपौर्णिमेस सुवासिनी वडाच्या झाडाची पूजा कां करतात ?

(५) **टीपा लिहा** :—(अ) भागीरथी, (ब) सर ह्यू रोज, (क) सत्यवान.

अनुक्रम २२६३३
९९
३०-७-८०
IRBK-0106450